OFFICE OF THE COLLECTOR BEED

सत्यमेव जयते

(10)

जिल्हाधिकारी कार्यालय बीड

(जमाबंदी-०१ शाखा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

पहा:- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र.एलएनडी-१०९०/२१५३/प्र.क्र.२०८/ज-१, दि.१२.२.१९९१
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमिन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१,दि.०७.०३.२००६
३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१/दिनांक २८.०५.२०१०
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१ दि.१२.०७.२०११
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१,दि.२७.०७.२०११
६. महसूल व वन विभागाची अधिसुचना दिनांक ३१.१२.२०१५
७. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांचे पत्र क्र.१६२३/सैनिक संकुल/जिसैकका-१ दि.०७.०६.२०१८
८. तहसिलदार बीड यांचे पत्र क्र.२०१५/जमा-२/गा.ज.कावि- दि०६.०६.२०१८
९. उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्र.२०१८/जमा/संकीर्ण/कावी-११०४ दि.१५.०६.२०१८

क्र.२०१८/मशाका/जमा-१/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक. .०६.२०१८.
13.07.2018

## आदेश

ज्या अर्थी उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्र.२०१८/जमा/संकीर्ण/कावी-११०४ दि.१५.०६.२०१८ अन्वये मौजे बीड तरफ ता.जि.बीड येथील गायरान जमीन स.नं.३४ मधुन १० गुंठे जमीन जिल्हा सैनिक संकुलासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांना उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव सादर करुन जमीन मंजुर करणेची शिफारस केली आहे.

ज्या अर्थी महसूल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३ (ब) ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासकीय जमीन आवश्यक असेल,तर अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असेल तरी, जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधीत विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील अशी तरतुद आहे.

ज्या अर्थी सह दुय्यम निबंधक वर्ग-१ बीड यांनी दिनांक ०७.६.२०१८ च्या पत्रान्वये मौजे बीड तरफ ता.जि.बीड येथील गायरान जमीन स.नं.३४ मधील १० गुंठे जमीनीचे मुल्यांकन रक्कम रुपये २९,००,०००/- (अक्षरी एकोणतीस लाख फक्त)असल्याचे कळविले आहे.

ज्या अर्थी महसूल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३ (ब) मधील तरतुदीनुसार सदर जमिन शासनाचे विभागास देणे असल्याने महसूलमुक्त व सारामाफीने देणेबाबत तरतुद आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नियम २० व ३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५,६,१४,१५ तसेच व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५ नुसार व वेळोवेळचे शासन निर्णय/परिपत्रकास अधिन राहुन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मौजे बीड तरफ ता.जि.बीड येथील गायरान जमीन स.नं.३४ मधुन १० गुंठे जमीन जिल्हा सैनिक संकुलासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांना खालीलप्रमाणे आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन दर्शविण्यात आलेल्या चतु:सिमाप्रमाणे मंजुर येत आहे.

चतु:सिमा

| | |
|---|---|
| पूर्वेस | : शासकीय गोदाम |
| पश्चिमेस | : सैनिकी मुलांचे वस्तीगृह |
| दक्षिणेस | : रस्ता |
| उत्तरेस | : रस्ता |

अटी /शर्ती

१. जमीन मंजुर केलेल्या दिनांकापासुन महाराष्ट्र जमीन महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र.जमीन-०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१ दिनांक १०.१०.२०१३ नूसार शासकीय जमीनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करण्याचे जबाबदारी संबंधीत शासकीय जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्यांची आहे. त्यानुसार सदर जमीनीच्या कोणत्याही क्षेत्रावर अतिक्रमण होणार नाही याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत

OFFICE OF THE COLLECTOR BEED
सत्यमेव जयते

जिल्हाधिकारी कार्यालय बीड
(जमाबंदी-०१ शाखा)

फोन क्र.०२४४२/[illegible]६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

विभागाची राहील. जमीनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील.

१. तसेच आदेशातील शासन निर्णयामधील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत बाबतचे लेखी कबुलायत देणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त जमिनीची आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनिमय १९६६ व त्या खालील वेळोवेळी केलेल्या सुधारणा व नियमानुसार करण्यात येईल.

३. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार जमीन मंजुर करण्यात येत असुन सदरील प्रस्तावातील अपूर्ण कागदपत्रे असल्यास त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील.

४. मंजुर केलेल्या जमिनीपैकी १० % क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे बंधनकारक राहील व या अटीचे उल्लंघण केल्यास शर्तभंग समजून कार्यवाही केली जाईल.

५. सदर जमीन दिलेल्या प्रयोजनार्थ एक वर्षाच्या आंत उपयोगात आणावी अन्यथा जमीन परत घेण्यात येईल.

६. संबंधीत कार्यालय सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणुन धारण करेल मंजुर आदेशातील अटींचा भंग झाल्यास सदर जमीन परत बांधकामासह त्यांवरील सर्व बाबीसह सरकार जमा करण्यास पात्र राहील व कोणताही मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

७. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी करणे बंधनकारक राहील.
या जमिनीचे हस्तांतरण ,विक्री,लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी बीड यांचे पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही.

८. प्रस्तावा संबंधातील सर्व आवश्यक कागदपत्रे पुर्ण करण्याच्या अटींवर मौजे बीड तरफ ता.जि.बीड येथील गायरान जमीन स.नं.३४ मधुन १० गुंठे जमीन मंजुर करण्यात येत आहे.

९. या आदेशातील व वेळोवळच्या सर्व अद्यावत शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधीतावर बंधनकारक राहील.

जिल्हाधिकारी बीड

प्रतिलिपी:

१. मा.प्रधान सचिव महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
३. उपविभागीय अधिकारी बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४. तहसिलदार बीड यांना देवुन कळविण्यात येते की,उप अधिक्षक भुमी अभिलेख बीड यांचे मोजणी नकाशाप्रमाणे जमिनीचा ताबा देवुन कब्जे पावती व पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.
५. उप अधिक्षक भुमी अभिलेख बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी , बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव .

जिल्हाधिकारी बीड

OFFICE OF THE COLLECTOR BEED सत्यमेव जयते

फोन क्र.०२४४२/२२२६०४ जिल्हाधिकारी कार्यालय बीड (जमाबंदी-०१ शाखा) फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

संदर्भ:१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र.एलएनडी-१०९०/२१५३/प्र.क्र.२०८/ज-१, दि.१२.२.१९९१
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमिन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१,दि.०७.०३.२००६
३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१/दिनांक २८.०५.२०१०
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१ दि.१२.०७.२०११
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१,दि.२७.०७.२०११
६.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक -संकिर्ण २०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३ दि.१७.१.२०१३
७. महसूल व वन विभागाची अधिसुचना दिनांक ३१.१२.२०१५
८.महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: जमीन-२०१६/प्र.क्र.२५४//ज-१ दिनांक ११ जानेवारी २०१७
९. उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र जा.क्र.२०१८/जमा/कावि-२६७ दि.१२.३.२०१८
१०.जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांचे पत्र जा.क्र.जिरुबी/नियोजन/३०२९१-९२ दि.२०.१२.२०१६
११. सह जिल्हा निबंधक , वर्ग-१ तथा नोंदणी व मुद्रांक विभाग बीड यांचे पत्र जा क्र मुल्यांकन/सजिनिबीड/२०१७/१४०५ दि.२९.०८.२०१७.

क्र.२०१८/मशाका/जमा-१/कावि-२७८
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक. २२.०३.२०१८.

## आदेश

ज्या अर्थी उपविभागीय अधिकारी ,बीड यांनी त्यांचे पत्र क्र. २०१८/जमा/कावि-२६७ दि.१२.३.२०१८ अन्वये मौजे वारणी ता.शिरुर कासार जि.बीड येथील गायरान जमीन ग.नं.२५९ मधुन २.०० हे.आर जमीन ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत व निवासस्थान बांधकाम करणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांना जमीन उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव सादर करुन जमीन मंजुर करणेची शिफारस केली आहे.

ज्या अर्थी महसूल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३ (ब) ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासकीय जमीन आवश्यक असेल,तर अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असेल तरी, जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधीत विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील अशी तरतुद आहे. आणि ज्या अर्थी संदर्भ क्रमांक ६ अन्वये महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे शासन निर्णयानूसार बीड जिल्हयातील शिरुर कासार साठी उपजिल्हा रुग्णालय मंजुर करण्यात आलेले आहे.

ज्या अर्थी सह दुय्यम निबंधक वर्ग-१ बीड यांनी दिनांक २९.८.२०१७ च्या पत्रान्वये मौजे वारणी ता.शिरुर कासार येथील गायरान जमीन ग.नं.२५९ मधुन २.०० हे.आर जमीन जमीनीचे मुल्यांकन रक्कमरुपये १,६१,२८,०००/-आहे. (अक्षरी एक कोटी एकसष्ट लाख अठ्ठावीस हजार फक्त)असल्याचे कळविले आहे.

ज्या अर्थी महसूल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३ (ब) मधील तरतुदीनुसार सदर जमिन शासनाचे विभागास देणे असल्याने महसूलमुक्त व सारामाफीने देणेबाबत तरतुद आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनिमय १९६६ नियम २० व ३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५,६,१५ ला व संदर्भ क्र. २,४,५,६ ला व शासन महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५ व वेळोवळच्या शासन निर्णयास अधिन राहुन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मौजे वारणी ता.शिरुर कासार येथील गायरान जमीन ग.नं.२५९ मधुन २.०० हे.आर शासकीय जमीन ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत व निवासस्थान बांधकाम करणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांना खालीलप्रमाणे आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन दर्शविण्यात आलेल्या चतु:सिमाप्रमाणे जमीन मंजुर करण्यात येत आहे.

चतु:सिमा

पूर्वेस : न्यायालयीन इमारत व निवासस्थानासाठी जमीन